NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

दिनांक ०८.११.२०२६ रविवार

(गुन्हे)

पोलीस ठाणे गणेशपेठ :–जबरी चोरी करणाऱ्या ०२ आरोपींना अटक.

फिर्यादी मनोजकुमार शंभु साह वय २८ वर्ष रा. भगवनापुर, बिरत, बिहार, ह.मु. मुकुटबन, यवतमाळ हे मुकुटबन येथे मॅक्समेंट इंजि. लिमीटेड येथे काम करतात. दिनांक ०६.११.२०२६ चे २०.०० वा. चे सुमारास, ते त्यांचे इतर साथीदार कर्मचारी यांचेसह नागपुर येथे बसने आले. बसस्थानक येथुन रेल्वे स्टेशन जाण्याकरीता ऑटोरिक्षा ठरविला असता, ऑटोरिक्षा चालकाने रेल्वे स्टेशन येथे न नेता, त्यांना पोलीस ठाणे गणेशपेठ हद्दीत जाधव चौक, राहुल कॉम्प्लेक्स–२ येथील प्रिन्स टुर अॅन्ड ट्रॅव्हल्सचे ऑफीसमोर घेऊन गेला. तेथे ऑटोचालक व त्याचे इतर तीन साथीदार यांनी संगनमत करुन, फिर्यादी व त्यांचे ४ साथीदार यांना बळजबरीने ट्रॅव्हल्स ऑफीसमध्ये नेऊन मारहाण केली व जिवे मारण्याची धमकी देऊन, जबरीने ट्रॅव्हल्सचे तिकीट काढण्यास भाग पाडले. तसेच आरोपींनी फिर्यादी व त्यांचे साथीदारांचे जवळील रोख ६,७००/– रु. जबरीने हिसकावुन घेतले व २,८००/– रु. ऑनलाईन पध्दतीने आरोपीचे खात्यावर पाठविण्यास भाग पाडले. फिर्यादी यांनी डायल ११२ येथे फोन करुन तक्रार केली असता, गणेशपेठ पोलीसांनी घटनास्थळी पोहोचुन आरोपी १) अमर विजय इंगुलवार वय ३८ वर्ष रा. कर्नलबाग, काशिबाई देऊळ मार्ग, गणेशपेठ, नागपूर २) शेख नुरुल हसन शेख मुराद बाशा वय २७ वर्ष रा. गौसिया मस्जिदजवळ, विराटनगर, बुम्मनाहली, बॅगलोर, कनार्टक यांना ताब्यात घेतले. त्यांचे ईतर ०२ साथीदार पाहिजे आरोपी ३) खंडया(गौतम) व एक इतर हे तेथुन पळुन गेले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे गणेशपेठ येथे आरोपींविरूध्द कलम ३०९(४),११५(२),३५१(३),१२६(२),३(५) भान्यासं. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपी क्र. १ व २ यांना अटक केली आहे. पाहिजे आरोपींचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

(अकस्मात मृत्यु)

१) पोलीस ठाणे वाडी:– दिनांक ०७.११.२०२६ चे १७..० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे वाडी हद्दीत, मौजा वडधामना, खसरा क्र. १३६/३/१ येथील लिलाधर वानखेडे यांचे मालकीचे मोकळया पडीक शेतातील एका झाडाला एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ३० ते ३५ वर्षे वयाचे, गळफास घेतलेल्या स्थितीत मृत अवस्थेत मिळुन आले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. मृतकाचे वर्णन–रंग–सावळा, चेहरा–लांबट, बांधा–मजबुत, उंची–५ फुट ६ इंच, डोक्याचे केस–काळे व कुरळे, अंगात–पांढरा फुलबाहीचा शर्ट व निळ्या रंगाचा फुलपॅन्ट घातलेला आहे. वर्णनावरुन मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे वाडी येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी फिर्यादी स्वप्निल हरीभाऊजी क्षिरसागर वय ३० वर्ष रा. घर क्र. ४७५, मौजा वडधामना, वानखेडे लॉन जवळ, अमरावती रोड, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे वाडी येथे अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

२) पोलीस ठाणे जरीपटका:— दिनांक ०८.११.२०२६ चे ०८.४० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत, बर्डी ते कामठी जाणाऱ्या रोडवरील मेट्रो फ्लायओव्हरचे खाली पिल्लर क्र. ९८ त ९९ चे मध्यभागी डिव्हायडरवर एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ४५ वर्षे वयाचे, अंगात निळया रंगाचे शर्ट व क्रिम रंगाचा फुलपॅन्ट घातलेल्या वर्णनाचे, बेशुध्द अवस्थेत मिळुन आले. त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. मृतकाचे वर्णनावरुन मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे जरीपटका येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे जरीपटका येथे पोउपनि देवचंद सहारे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

३) पोलीस ठाणे हिंगणा:— दिनांक ०८.११.२०२६ चे १०.०० वा. चे सुमारास, फिर्यादीचे भाऊ नामे प्रशांत पांडुरंग मुंगल वय ३५ वर्ष रा. वार्ड क्र. १, मु. वघाडा, पोस्ट कोपरा, ता. सेलु, जि. वर्धा हे त्यांचे स्प्लेंडर प्लस वाहन क्र. एमएच ४० सीवाय २१२९ ने मावशीचे घरुन धनगरपुरा, हिंगणा येथुन गावाला जात असता, पोलीस ठाणे हिंगणा हद्दीत, येरनगाव ते कवडस रोड दरम्यान केसीसी कंपनीजवळील टर्निंगवर त्याचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने, ते रोडच्या कडेला असलेल्या सागवानाचे झाडाला धडकुन गंभीर जखमी झाले. त्यांना उपचाराकरीता ग्रामीण रुग्णालय हिंगणा येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले.

याप्रकरणी फिर्यादी नितीन पांडुरंग मुंगल वय ४१ वर्ष रा. वार्ड क्र. १, मुक्काम वघाडा, पोस्ट कोपरा, ता. सेलु, जि. वर्धा यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे हिंगणा येथे पोउपनि संतोष राठोड ९९२२२०३३३६ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

स्वा/—
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.